**नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नाशिक (म्हाडा प्रादेशिक घटक)**
**सुविधा, व्यावसायिक व विशिष्ट प्रयोजनासाठी राखीव असलेल्या अनिवासी भूखंडाचे**
**ई- लिलावाव्दारे विक्रीकरीता निमंत्रण**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातर्फे (म्हाडा), मंडळाच्या अखत्यारितील सुविधा, व्यावसायिक व विशिष्ट प्रयोजनासाठी राखीव असलेल्या अनिवासी भुखंडाच्या **भाडेपट्टयाने** विक्रीसाठी मुख्य अधिकारी, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ ई-लिलाव प्रक्रिया राबवीत आहेत. या अनिवासी भुखंडाचे विक्री व वितरण महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण आणि अदलाबदल ) विनियम १९८१ मधील तरतूदीनुसार करण्यात येईल.

**ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी अर्जदारांनी माहिती पुस्तिका काळजीपूर्वक वाचावी. तसेच योजनेच्या ठिकाणी प्रत्यक्ष जायमोक्यावर भेट देवून, त्याचप्रमाणे वास्तुशास्त्रज्ञ विभागामध्ये समक्ष भेट देऊन सदर भुखंडाचे नकाशे, त्याचे क्षेत्रफळ, चतू:सीमा, लगतचे रस्ते व प्रयोजन याची तपासणी करून घ्यावी. त्यानंतरच अर्ज भरावा.**

नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांतर्गत सुविधा, व्यावसायिक व विशिष्ट प्रयोजनासाठी राखीव असलेल्या अनिवासी भूखंडांच्या विक्रीसाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण व गाळ्याची अदलाबदल) विनियम १९८१ मधील तरतुदी अनुसार व त्या त्या वेळी, त्या त्या अवस्थाप्रत लागू केल्या जाणाऱ्या तरतूदी व महाराष्ट्र शासनाच्या ई-लिलाव अधिसूचनेस अधीन राहून इच्छुक लिलाव धारकांकडून ई-लिलावामार्फत ऑनलाईन बोली पध्दतीने नाशिक, अहिल्यानगर, धुळे आणि जळगाव या जिल्हयातील विविध व्यावसायिक आरक्षणासाठी राखीव असलेल्या **३१** अनिवासी भूखंडाच्या एकरकमी विक्रीकरीता अर्ज/निविदा मागविण्यात येत आहेत. [महाराष्ट्र शासनाच्या ई-लिलाव अधिसूचनेच्या अटी व शर्ती जशाच्या तशा व संपूर्णपणे (वेळोवेळी होणा-या सुधारणेसह) लागू राहतील].

## अनिवासी भूखंडाचा ई-लिलाव जुन-२०२५ संबंधी वेळापत्रक

| अ.क्र. | प्रक्रिया | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी संकेत स्थळावर नोंदणी करणे, ऑनलाईन अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे, अनामत रक्कम भरणे, इत्यादीकरीता सुरुवात दिनांक व वेळ | ३०.०६.२०२५ | दुपारी १२.०० वा. |
| २ | ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी संकेतस्थळावर नोंदणी करणे, ऑनलाईन अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे, अनामत रक्कम भरणे, इत्यादीकरीता अंतिम दिनांक व वेळ | २९.०७.२०२५ | रात्री ११.५९ पर्यंत |
| ३ | ई-लिलावाकरिता RTGS/NEFT व्दारे अनामत रक्कम भरण्याचा अंतिम दिनांक | ३०.०७.२०२५ | संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत |
| ४ | ई-लिलाव (ऑनलाईन बोली) सुरु होण्याची दिनांक व वेळ | दि.०६.०८.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता | |
| ५ | ई-लिलाव (ऑनलाईन बोली) करीता अंतिम दिनांक व वेळ | दि.०६.०८.२०२५ रोजी दुपारी ०५.०० वाजेपर्यंत | |
| ६ | इ-लिलावचा एकत्रित निकाल जाहीर करण्याचा दिनांक | दि.७.०८.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता. | |

**१) पात्रता निकष :**

१.१) १८ वर्षापेक्षा कमी वयाची व्यक्ती ई-लिलावामध्ये सहभागी होऊ शकत नाही. ई-लिलावामध्ये सहभागी झालेल्या व्यक्तीने स्वत:चे वय १८ वर्षापेक्षा जास्त आहे हे सिध्द करण्यासाठी आधारकार्ड व पॅनकार्ड सादर करणे आवश्यक आहे.

१.२) अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असणे बंधनकारक आहे. करिता अर्जदारास सन २०१९ नंतर जारी करण्यांत आलेले महाराष्ट्र राज्यातील वास्तव्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) सादर करणे आवश्यक आहे.

१.३) ई-लिलावामध्ये सहभागी झालेली व्यक्ती योजना संकेतामधील सर्व योजनेसाठी अर्ज दाखल करु शकतात. प्रत्येक योजनेकरिता स्वतंत्र अर्ज करावे लागतील व प्रत्येक अर्जासोबत स्वतंत्र अनामत रकमेसह ई-लिलावामध्ये सहभागी होण्यासाठीचे अर्ज शुल्क, प्रक्रिया शुल्काचा भरणा Net Banking, Credit Card, Debit Card, व्दारे Online Payment करु शकतात. तसेच RTGS/NEFT मार्फत भरणा करु शकतात. मात्र एका योजना संकेतामध्ये एकापेक्षा अधिक अर्ज करता येणार नाहीत. एकाच संकेतामध्ये एकापेक्षा अधिक अर्ज केल्याचे आढळल्यास त्या अर्जदाराचे सर्व अर्ज कोणतेही कारण न देता रद्द करण्यात येतील.

१.४) ई-लिलावामध्ये सहभागी होणारी कंपनी अथवा सहकारी संस्था असल्यास पात्रतेसाठी नोंदणी प्रमाणपत्र तसेच कंपनीचे प्राधिकृत पत्र किंवा सहकारी संस्थेचा ठराव जोडणे बंधनकारक राहील. [ई-लिलावामध्ये बोली लावणे व इतर संबंधीत कामासाठी चेअरमन/सेक्रेटरी यांना प्राधिकृत / नियुक्त केल्याबाबतचा व चेअरमन / सेक्रेटरीचा फोटो, पॅन कार्ड, ई-मेल आयडी व मोबाईल नंबर वापरणेबाबतचा ठराव देणे बंधनकारक राहील.]

**२) अनिवासी भूखंडाच्या संगणकीकृत ई-लिलाव अर्ज सादर करण्याची कार्यपध्दती :-**

२.१) ई-लिलावासाठी म्हाडा संकेतस्थळ https://eauction.mhada.gov.in यावर अर्जदाराने सर्वप्रथम स्वत:ची नाव नोंदणी करावी व सर्व माहिती काळजीपुर्वक भरावी.

**ई-लिलावा करीता खालील प्रमाणे अर्ज करावा.**

**टप्पा १ :** म्हाडाच्या वेबसाईटवर स्वत:ची नोंदणी करा. (https://eauction.mhada.gov.in)

**टप्पा २ :** ओटीपी व्दारे तुमचा ईमेल आयडी आणि मोबाईल नंबर सत्यापित करा.

**टप्पा ३ :** तुमच्या वापरकर्ता क्रेडेन्शियल्ससह लॉगीन करा आणि सुरक्षित लॉगीनसाठी ओटीपी सत्यापित करा.

**टप्पा ४:** थेट डॅशबोर्डवरुन लिलाव निवडा.

**टप्पा ५:** ईएमडी पे बटणावर क्लिक करा जिथे तुम्हाला अर्ज करायचा आहे. (पर्याय तारीख आणि वेळेत सुरु होईल आणि समाप्त होईल)

**टप्पा ६:** नेट बँकींग, आरटीजीएस / एनईएफटी पर्यायांव्दारे ईएमडी भरा.

**टप्पा ७ :** ईएमडी यशस्वीरीत्या भरल्यानंतर प्रारंभीक बोली लावा. (टीप : हा वास्तविक बोली टप्पा नाही)

**टप्पा ८ :** त्यानंतर अर्जदार लिलाव बोलीसाठी सरळ पात्र ठरतील.

**टप्पा ९:** ईएमडी पेड डॅशबोर्ड लिलावा मधून लिलाव निवडा. ज्यांनी ईएमडी यशस्वीरित्या भरली आहे त्यांच्यासाठी वास्तविक बोली प्रक्रीया सुरु होते.

**टप्पा १०:** लिलाव परिणाम - वास्तविक लिलाव प्रक्रीया समाप्त झाल्यानंतर दुस-या दिवशी निकाल प्रदर्शित होईल.

**ई-लिलाव मध्ये सहभागी होणाऱ्या अर्जदाराने ऑनलाईन अर्ज करणेपूर्वी खालील माहिती सोबत ठेवावी म्हणजे अर्ज भरणे सुलभ होईल.**

- अर्जदाराचे आधारकार्ड.
- अर्जदाराचे पॅनकार्ड
- अर्जदाराचे महाराष्ट्रातील वास्तव्याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) (सन २०१९ नंतरचे)
- अर्जदाराचा आधारकार्डशी संलग्न (Linked) स्वत:चा भ्रमणध्वनी क्रमांक (Mobile No.) व ई- मेल आयडी.
- अर्जदाराच्या बँक खात्याचे तपशील.
- संस्थेने / कंपनीने अर्जदारास अधिकृत केल्याचे पत्र / ठराव व नोंदणी प्रमाणपत्र.

२.२) अर्जदाराने स्वत:च्या बचत / चालू / संयुक्त खात्याचा तपशिल जसे, बँकेचे नाव, शाखा व पत्ता, खाते क्रमांक, बँकेचा IFSC क्रमांक द्यावा. अर्जदारास दुसऱ्या व्यक्तीच्या बँक खात्याचा तपशिल देऊन अर्ज करता येणार नाही. असे केल्यास अर्ज अवैध ठरविण्यात येईल. तसेच एन.आर.आय. खात्याचा तपशिल चालणार नाही.

२.३) अर्ज भरताना कंपनी अथवा सहकारी संस्था अर्जदार असल्यास त्यांनी कंपनी अथवा सहकारी संस्थेचा बचत / चालू / संयुक्त खात्याचा तपशील द्यावा. (वैयक्तिक सभासदाचा बँक खात्याचा तपशील ग्राह्य धरला जाणार नाही.)

२.४) अयशस्वी लिलावधारकांची अनामत रक्कम ही बोलीच्या दिनांकापासून १५ दिवसांमध्ये परत करण्यात येईल. अर्जदारास अनामत रक्कमेचा परतावा अर्जदार ज्या खात्यातून किंवा ज्या पैसे देण्याच्या पध्दतीने (Payment Mode) अनामत रक्कम भरणा करणार आहे त्याच खात्यावर किंवा पैसे ज्या पध्दतीने मंडळास प्राप्त झालेले आहेत (way to source/back to source) परत करण्यात येणार आहे. याची अर्जदारांनी विशेष नोंद घ्यावी.

२.५) ई-लिलाव प्रक्रियेत सहभागी होणेसाठी ऑनलाईन अर्जाची किंमत तसेच **ई-लिलाव प्रक्रिया शुल्क रु.७,०८०/- विनापरतावा असेल**. [रु. ६०००/- + GST @१८% रु. १०८०/-]

३) **ई-लिलावासाठी अर्जदारास सर्व अनिवासी भुखंडासाठी अर्ज शुल्क व्यतिरीक्त प्रत्येकी अर्जनिहाय अनामत रक्कम (EMD AMOUNT) रु.५०,०००/- चा वेगळा भरणा करावा लागेल.**

४) यशस्वी लिलावधारक अपात्र ठरल्यास अथवा त्याने अर्ज मागे घेतल्यास अधिकतम अग्रक्रमानुसार द्वितीय लिलावधारकास प्रथम यशस्वी लिलावधारकाने लावलेल्या बोलीनुसार रक्कम भरण्याच्या अटीस अधीन राहून प्राधान्य देण्यात येईल. यशस्वी प्रथम व द्वितीय लिलावधारक हे दोन्ही लिलावधारक काही कारणास्तव बाद/अपात्र/रद्द ठरल्यास पुढील अग्रक्रमानुसार यशस्वी लिलावधारकाने बोली केलेला उच्चतम दर स्विकारण्याच्या अटीस अधीन राहून प्राधान्य देण्यात येईल. सदर प्रक्रियेस प्रतिसाद न मिळाल्यास त्या त्या संकेतातील अनिवासी भुखंडाचा ई-लिलाव नव्याने भविष्यात आयोजित करण्यात येईल.

५) सदर ई-लिलावामध्ये लिलावधारकांस रक्कम रु.५०,००,०००/- पर्यंत समतल किंमत असलेल्या भूखंडांकरीता रु.१०,०००/- च्या पटीमध्ये व रु.५०,००,०००/- पेक्षा जास्त समतल किंमत असलेल्या भूखंडांकरीता रु.५००००/- च्या पटीमध्य बोली लावणे आवश्यक आहे.

६) सदर ई-लिलाव फक्त ०१ वर्ष वैध राहील.

७) Help / Support करीता कृपया https://eauction.mhada.gov.in या वेबसाईट वर किंवा **www.mhada.gov.in** या संकेतस्थळावरील Lottery>Eauction>eauction portal ला भेट दयावी.

८) **अनिवासी भुखंडाच्या संगणकीकृत ई-लिलावाची कार्यपध्दती :**

८.१) जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या सर्व ऑनलाईन अर्जाची प्रथम ऑनलाईन पद्धतीने संगणकीय प्रणालीव्दारे पडताळणी करण्यात येईल. यात अर्जदाराने सादर केलेले सर्व कागदपत्रे तपासण्यात येतील. अपूर्ण / चुकीचे कागदपत्रे असलेले अर्ज नोंदणी प्रक्रीयेतून बाद करण्यात येतील. नोंदणी प्रक्रीया पूर्ण झालेल्या अर्जदारांना अनामत रक्कम, प्रक्रीया शुल्क व इतर शुल्क भरण्याची अनुमती देण्यात येईल. सदर प्रक्रीया पूर्ण झाल्यानंतर अर्जदार बोली प्रक्रीयेत सहभागी होऊ शकतात.

८.२) खालील प्रकारचे अर्ज आढळल्यास असे अर्ज निविदा प्रक्रियेमधून बाद करण्यात येतील.

- एकाच लिलावधारकाने एकाच संकेतामध्ये, एकाच प्रवर्गात एकापेक्षा जास्त केलेले अर्ज.
- वेगवेगळ्या निविदाकाराचे एकाच बँकेमध्ये एकच खाते क्रमांक.
- चुकीचा PAN / TAN क्रमांक आढळलेले अर्ज.
- १८ वर्षाखालील व्यक्तींनी भरलेले अर्ज.

९. ई-लिलावात यशस्वी झालेल्या अर्जदारांचे अर्जांचे क्रमांक म्हाडाच्या www.mhada.gov.in व https://eauction.mhada.gov.in या संकेतस्थळावर तसेच म्हाडाच्या सूचनाफलकावर प्रसिध्द करण्यात येईल. ई-लिलावामध्ये अयशस्वी, न्युनतम लिलावधारक अर्जदारांना त्यांनी अदा केलेली संपूर्ण अनामत रक्कम (विनाव्याज) Electronic Clearing System (E.C.S) / NEFT द्वारे अर्जदाराने अनामत रक्कम ज्या बँक खात्यातून भरणा केली त्या बँक खात्यात अदा करण्यात येईल.

**१०. ई-लिलावात यशस्वी झाल्यानंतर अर्जदाराने म्हाडाकडे दाखल करावयाच्या कागदपत्रांचा तपशील :**

यशस्वी व पात्र ठरलेल्या लिलावधारकांच्या कागदपत्रांची आवश्यकता असल्यास फेरतपासणी करण्याचे अधिकार मंडळास आहेत. यशस्वी लिलावधारकांना मागणी केलेल्या सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रती सादर करणे आवश्यक आहे. कागदपत्रे चुकीचे आढळल्यास अथवा चुकीची माहिती सादर केलेली असल्यास याप्रकारच्या अर्जदारांवर म्हाडा विनियम १८ अन्वये कार्यवाही करुन अशा लिलावधारकाचे वितरण रद्द करण्यात येईल. त्यावर अर्जदारास १५ दिवसांच्या आत मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी / प्राधिकरण यांचेकडे अपिल करता येईल व त्यांचा निर्णय अंतिम राहिल. यशस्वी अर्जदाराने १० दिवसांचे आत त्यांची स्विकृती ऑनलाईन नोंदविणे आवश्यक आहे. सदर कालावधीत स्विकृतीबाबत निर्णय न केल्यास त्यांचे वितरण रद्द करुन व्दितीय उच्चतम बोलीधारकास संधी देण्यात येईल व यासंदर्भात मंडळाचा निर्णय अंतिम असेल.

११.**अनिवासी भूखंडांची आधारभूत किंमत:**

अनिवासी भूखंडाची आधारभूत किंमत जाहिरातीमध्ये तात्पुरत्या स्वरूपात दर्शविली आहे. आधारभूत किंमत बदलण्याचा संपूर्ण अधिकार मुख्य अधिकारी / नाशिक मंडळ मंडळ यांनी राखून ठेवला आहे.

**१२. रक्कम भरण्याबाबतचे टप्पे व मुदत :**

१२.१) यशस्वी निविदाधारकाने स्वीकृती पत्राच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत त्याने नमूद केलेल्या निविदा रकमेच्या २५% रक्कम मंडळाकडे जमा करणे बंधनकारक राहील.

१२.२) यशस्वी निविदाधारकाने स्वीकृती पत्राच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत UDCPR २०२० मधील अटींनुसार सुविधा भूखंड ज्या प्रयोजनासाठी राखीव आहे त्याच प्रयोजनासाठी भूखंडाचा विकास/बांधकाम करण्यासाठी मंडळाकडे सशर्त नाहरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज करणे बंधनकारक राहील.

१२.३) संबंधित प्राधिकरणाच्या (म्हाडा प्राधिकरण/राज्य सरकार) मान्यतेने मंडळाचे मुख्य अधिकारी यांचे मार्फत यशस्वी निविदाधारकाला संबंधित स्थानिक नियोजन प्राधिकरणाकडून बांधकाम परवानगी मिळविण्यासाठी UDCPR २०२० मधील अटींनुसार ज्या प्रयोजनासाठी भूखंड राखीव आहे त्याच प्रयोजनासाठी विकास/बांधकाम करण्यासाठी सशर्त नाहरकत प्रमाणपत्र देण्यांत येईल.

१२.४) तथापि यशस्वी निविदाधारकाने विहित कालावधीत सशर्त नाहरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज केला नाही तर त्यांची निविदा रद्द करण्याचे अधिकार मंडळाकडे राखून ठेवण्यांत येत आहेत.

१२.५) सशर्त नाहरकत प्रमाणपत्र दिल्याच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत संबंधित नियोजन प्राधिकरणाकडून बांधकाम परवानगी घेणे निविदाधारकांस बंधनकारक राहील.

१२.६) जर यशस्वी निविदाधारकाने ९० दिवसांच्या विहित कालावधीत नियोजन प्राधिकरणाची बांधकाम परवानगी मंडळास सादर केली नाही तर त्यांची निविदा रद्द करण्याचे अधिकार मंडळाकडे राखून ठेवण्यांत आलेले आहेत.

१२.७) स्थानिक नियोजन प्राधिकरणाकडून प्राप्त बांधकाम परवानगी या कार्यालयास सादर केल्यानंतर यशस्वी निविदाधारकास अंतिम नाहरकत प्रमाणपत्र देण्यांत येईल. तद्नंतर ३० दिवसांच्या आत त्याने नमूद केलेल्या निविदा रकमेच्या उर्वरीत ७५% रक्कम मंडळाकडे जमा करावी लागेल.

१२.८) उर्वरीत ७५% रक्कम विहित मुदतीत अदा करणे शक्य नसल्यास मुदतीच्या आत मुख्य अधिकारी/नाशिक मंडळ यांचेकडे मुदतवाढीसाठी अर्ज करता येईल. मुख्य अधिकारी यांना योग्य वाटल्यास विलंबाने भरलेल्या रकमेवर विलंब कालावधीकरीता द.सा.द.शे. १८.०० दराने विलंब शुल्क आकारुन जास्तीत जास्त ३० दिवसापर्यंत मुदतवाढ देण्यांत येईल. तथापि मुदत वाढीबाबतचे सर्व अधिकार मुख्य अधिकारी/नाशिक मंडळ यांना असतील. कोणत्याही परिस्थितीत उर्वरित ७५% रक्कम भरण्याची अंतिम मुदत या कार्यालयामार्फत अंतिम नाहरकत प्रमाणपत्र दिल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांपेक्षा जास्त वाढवली जाणार नाही.

१२.९) उपरोक्त कोणत्याही टप्प्यावर निविदाधारक अटी व शर्तीची पूर्तता करण्यांस असमर्थ ठरल्यास त्यांची निविदा रद्द करण्यांत येईल व त्याने भरणा केलेली २५% रक्कम विनाव्याज परत करण्यांत येईल. तथापि निविदेसोबत भरलेली अनामत रक्कम व्यपगत करण्यांत येईल. तद्नंतर द्वितीय उच्चतम निविदाधारक प्रथम उच्चतम निविदधारकाने नमूद केलेल्या दराने भूखंड घेण्यांस सहमत असल्यास त्यास सदर भूखंडाचे देकार देण्यात येईल.

१३) २५ टक्के विक्री किंमतीचा भरणा केल्यानंतर यशस्वी लिलावधारकाने मागणी केल्यास RBI मान्यताप्राप्त बँक/वित्तिय संस्थेकडून कर्ज प्राप्त होण्यासाठी मंडळाचे "ना हरकत प्रमाणपत्र" देण्यात येईल. त्याकरिता लिलावधारकाने बँकेचे Provisional Sanction Letter For Loan सादर करून "ना हरकत प्रमाणपत्र" मिळणेसाठी अर्ज करणे आवश्यक आहे.

१४) रु. ५०.०० लाख आणि त्यापेक्षा जास्त विक्री किंमत असलेल्या भूखंडासाठी यशस्वी लिलावधारकांस नियमानुसार विक्री किंमतीचया १% रक्कम TDS स्वरुपात आयकर विभाग, भारत सरकार यांचेकडे म्हाडा यांचे नावे भरणे बंधनकारक राहील.

१५) अनिवासी भूखंडांसाठी भरणा केलेल्या अनामत रकमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज दिले जाणार नाही.

१६) अनिवासी भूखंडांसमोरील मोकळया जागेवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम व अतिक्रमण करता येणार नाही.

१७) **अनिवासी भुखंड वितरणाच्या इतर महत्त्वाच्या अटी -**

१८.१.) या माहिती पुस्तकेत दिलेला तपशील परिपूर्ण नसून, फक्त मार्गदर्शनार्थ आहे. अनिवासी भुखंडाच्या वितरणाच्या अटी व शर्ती यशस्वी लिलावधारकांना बंधनकारक राहतील. तसेच महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण व सदनिकेची अदलाबदल) विनियम १९८१ / महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ मधील तरतुदी तसेच वेळोवेळी होणा-या सुधारणांसह अर्जदारास जशाच्या तशा व संपूर्णपणे बंधनकारक राहतील.

१८.२) मंडळातर्फे मोकळा भुखंड वाटप करण्यात येणार आहे. महानगरपालिकेचे सर्व कर, पाणीपट्टी, मल:निस्सारण आकार, वीज आकार इत्यादी यशस्वी लिलावधारकास संबंधित स्थानिक संस्थाकडे परस्पर भरावे लागतील.

१८.३) अनिवासी भूखंडांच्या गाळ्याचा पुर्ण विक्री किंमतीचा भरणा (वर नमूद केलेल्या पध्दतीनुसार) केल्यानंतरच सदर गाळ्याचा ताबा देण्यात येईल.

१८.४) प्राधिकरणाच्या प्रचलित धोरणानुसार उच्चतम निविदाधारकास सदर अनिवासी भुखंडाचे नियमानुसार अकृषिकर, भुईभाडे व इतर कर यांचे भांडवलीकरण करुन येणारी रक्कम त्यांच्या ई-लिलावातील दराव्यतिरीक्त भरणा करावी लागेल. त्याशिवाय भूखंडाचे वाटप करण्यांत येणार नाही.

१८.५) सदर रक्कम भरणा केल्यानंतर देण्यात येणा-या वाटपपत्रावर यशस्वी लिलावधारकांना महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार विक्री किंमतीवर विहित मुद्रांक शुल्क भरावे लागेल. याबाबतचे कागदोपत्री पुरावे सादर करणे आवश्यक असेल. त्याशिवाय ताबा पत्र देण्यात येणार नाही.

१८.६) सदर अनिवासी भुखंड असलेल्या गृहनिर्माण संस्थेस इमारतीचे सेवा हस्तांतर करण्याची कार्यवाही पूर्ण झाली असेल तर सेवाशुल्काची बाब सदर गृहनिर्माण संस्थेशी संबंधित राहिल. गृहनिर्माण संस्थेच्या नियमानुसार यशस्वी लिलावधारकास सेवाशुल्काची संपूर्ण रक्कम भरणे बंधनकारक आहे.

१८.७) शासनाच्या धोरणानुसार / अधिसुचनेनुसार मंडळाने विक्रीकरीता काढलेल्या भूखंडास विक्री किंमती व्यतिरिक्त वस्तु व सेवा कर (Goods & Service Tax) लागू झाल्यास सदर कर अथवा भविष्यात लागू होणारे इतर कर यशस्वी लिलावाधारकास परस्पर संबंधित कार्यालयात भरावे लागतील.

१८.८) यशस्वी लिलाव धारकाला संबंधित अनिवासी भुखंडाचा वापर ज्या प्रयोजनासाठी भूखंड राखीव आहे त्याच प्रयोजनासाठी करावा लागेल. संबंधित भुखंडावर म्हाडाने/स्थानिक स्वराज्य संस्थेने लागु केलेले व्यवसायासंबंधी जे नियम असतील त्याप्रमाणे व्यवसाय करणे बंधनकारक असेल. आजूबाजूच्या रहिवाश्यांना त्रास होईल/आक्षेप असेल असा कोणताही व्यवसाय करता येणार नाही.

१८.९) वितरीत केलेल्या अनिवासी भुखंडामध्ये कोणत्याही प्रकारचे बदल अथवा जादाचे बांधकाम मुख्य अधिकारी / नाशिक मंडळ यांचे परवानगीशिवाय करता येणार नाही.

१८.१०) कोणत्याही प्रकारे भौतिकदृष्ट्या हानी होईल अशा प्रकारे वापर करु नये.

१९. उच्चतम दर प्राप्त झालेल्या निविदाधारकास ताबा हस्तांतरित करताना आहे त्या स्थितीत करण्यांत येईल.

२०. शासन निर्णय क्र. सुविधा -११०४/प्र.क्र.४९ /गृनिभू-१ दि.२२/११/२००५ मध्ये गृहनिर्माण व क्षेत्रविकास(जमीनीचे वाटप) विनियम ,१९८२ अंतर्गत विनियम १६ अन्वये ९ नागरी समूहातील सुविधा भूखंड वाटपाचा प्रस्ताव मंत्रिमंडळ उपसमितीची मान्यता घेण्यासाठी शासनास सादर करण्याबाबत नमूद केलेले आहे. त्यानुसार ९ नागरी समूहामध्ये नाशिकचा समावेश होत असल्याने नाशिक मधील भूखंड वितरणापूर्वी मंत्रिमंडळ उपसमितीची मान्यता प्राप्त झाल्यानंतर व वितरणाच्या अटी व शर्तींची पूर्तता झाल्यानंतर सदर भूखंड वाटप करण्यात येईल.

२१. **भूखंडाचे वाटप:**
भूखंडाचे वाटप महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण आणि अदलाबदल ) विनियम १९८१ मधील तरतुदींनुसार व त्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या सुधारणांच्या अधीन राहून भाडेपट्टयाने वाटप केले जाईल. पहिल्या ३० वर्षासाठी भाडेपट्टा दर प्रथम कळविण्यांत येईल. त्यानंतर दर ३० वर्षांनी भाडेपट्टा नूतनीकरण केले जाईल. भाडेपट्टयाच्या दरात वेळोवेळी होणाऱ्या सुधारणेनुसार दर भरणे बंधनकारक राहील.

२२. लिलावधारक याने ई-लिलावामध्ये लावलेल्या बोली रक्कमे व्यतिरिक्त खालील सरकारी शुल्क अलाहीदा भरणे बंधनकारक असेल.

- महानगरपालिका कर
- विम्याचा हप्ता
- कागदपत्रांसाठी लागणारे कायदेशीर शुल्क
- भाडेपट्टा
- मंडळाकडे भरावयाच्या तीन महिन्यांचे सेवा शुल्क
- सहकारी संस्थेसाठी लागणारे नोंदणी किंवा तत्सम शुल्क
- महाराष्ट्र शासनास भरण्यात येणारे मुद्रांक शुल्क
- विद्युतमापकासाठीचे अनामत रक्कम, परवाना शुल्क इ.

सदरची अनिवासी भुखंड "जसे आहेत व जेथे आहेत त्या स्वरुपात" या तत्त्वावर विकण्यात येणार आहेत. लिलावधारकाने ई-लिलाव प्रक्रीयेत भाग घेण्यापूर्वी प्रत्यक्ष जागेवर भुखंडाची पाहणी करुन बोली लावणे आवश्यक / अपेक्षित आहे. तद्पश्चात सद्यस्थितीवरुन बोली रद्द करणेबाबत अर्ज प्राप्त झाल्यास असे अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. तथा अशा लिलावधारकांची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

२३. माहिती पुस्तिका मराठी भाषांमध्ये तयार केलेली आहे. असे करीत असताना माहिती पुस्तिकेत विसंगती आढळल्यास लिलावधारकास त्याचा गैरफायदा घेता येणार नाही.

२४. अर्जदाराने संकेतस्थळावरील व माहितीपुस्तिकेतील सर्व अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचूनच अर्ज सादर करावा.

**मुख्य अधिकारी, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी कोणतेही कारण न देता, या ई-लिलावासाठी येणारे अर्ज स्विकारणे वा नाकारणे किंवा जाहिरात देतांना काही चुक झाल्यास त्या दुरुस्तीबाबतचे तसेच सर्व योजना किंवा एखादी विशिष्ट योजना रद्द करण्याचे तसेच या ई-लिलावासंबंधीत संपुर्ण अधिकार राखून ठेवले आहेत. मुख्य अधिकारी यांनी घेतलेला निर्णय सर्वांना बंधनकारक असेल.**

**स्वाक्षरीत**
**(शिवकुमार आवळकंठे)**
**मुख्य अधिकारी**
**नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ**
**नाशिक**

# ठळक बाबी

- ई-लिलावामध्ये ज्या अनिवासी भुखंडाचा समावेश करण्यात आलेला आहे त्याबाबतचा संपुर्ण तपशील मराठी व इंग्रजी भाषेत खालील नमुद तक्त्यामध्ये देण्यात आलेला आहे.

- अर्जदारांनी अर्ज करावयाच्या अनिवासी भुखंडाची संपुर्ण माहिती व्यवस्थित वाचून घ्यावी. तसेच योजनेचे ठिकाण प्रत्यक्ष जायमोक्यावर याबाबत भेट देवून अर्जाचा भरणा करावा. त्याचप्रमाणे वास्तुशास्त्रज्ञ विभागामध्ये समक्ष भेट देऊन सदर भुखंडाचे नकाशे, त्याचे क्षेत्रफळ, चतू:सीमा, लगतचे रस्ते व प्रयोजन याची तपासणी करू न घ्यावी. सदर तपासणी नुसार UDCPR प्रमाणे नमुद केलेला वापर सद्यास्थितीत करता येईल किंवा कसे याबाबत निर्णय घ्यावा.

- ई-लिलावाची प्रक्रिया पार पडल्यानंतर अर्जदारांचे याबाबत म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

- ई-लिलावाच्या अंतिम बोलीकरिता दि. ६/०८/२०२५ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत वेळ देण्यात आलेली आहे. परंतु सदर ई-लिलाव ऑनलाईन पध्दतीने असल्याने जो अर्जदार वेळ समाप्तीच्या वेळेस अंतिम बोली लावेल त्यानंतर **१०** मिनिटाचा वाढीव वेळ असणार आहे. व ५.०० वाजेनंतर लावलेल्या बोलीसाठी रु.५०,०००/- चा टप्पा असेल याची नोंद घेण्यांत यावी.

- अंतिम भूखंड क्र २३३ (भाग) अंमळनेर, जिल्हा जळगांव येथील भुअभिन्यासामधील वाणिज्य भूखंडाचे एकत्रित क्षेत्र भुअभिन्यासामध्ये नमूद करण्यात आलेले असून प्रत्यक्ष जागेवर सदर भुखंड तीन भागांत विभाजीत करण्यात आलेला आहे. सदर भागांचे क्षेत्र व चतू:सिमा जाहिरातीमध्ये अ.क्र. २९, ३० व ३१ वर नमूद करण्यात आलेले आहे, तरी देखील अर्जदार यांनी सदर भुखंडांसाठी लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यापूर्वी प्रत्यक्ष जागेवर भेट देणे व या कार्यालयात उपलब्ध असलेल्या नकाशाची पाहणी करण्यांत यावी. लिलाव प्रक्रियेनंतर सदर बाबत आपली काही हरकत असल्यास विचारात घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

- ई-लिलावा संबंधित सर्व अधिकार मा.मुख्य अधिकारी/नाशिक मंडळ यांनी राखून ठेवलेले आहेत.

**लिलाव पध्दतीने व्यायसायिक/ सुविधा भूंखड जुन-२०२५**

**नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नाशिक (म्हाडा विभागीय घटक)**

**व्यावसायिक व सुविधा भूखंड (अनिवासी वापर)**

| अनु क्र. | जिल्हा | वसाहतीचे नाव व ठिकाण | भुखंडाचा अनुज्ञेय वापर | विकास आराखडा (डि.पी.) आरक्षण | भुखंडाचे क्षेत्रफळ अंदाजित चौ.मी. | भुखंडाचा प्रति चौ.मी.दर | विक्री किंमत(बेस प्राईस) | अक्षांश | रेखांक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | स. क्र. ५१७,५२०,५२१,५२३ सातपूर नाशिक | सुविधा भुखंड | - | ४८४.१२ | ३३८२० | १६३७२९३८.४० | १९.९९०१५ | ७३.७२६७५४ |
| २ | नाशिक | स. क्र. ५१७,५२०,५२१,५२३ सातपूर नाशिक | वाणिज्य ( शॉपिंग भूखंड ) | - | २८.४७ | ३३८२० | ९६२८५५.४० | १९.९९०३७९ | ७३.७२८४१ |
| ३ | नाशिक | स. क्र. ५१७,५२०,५२१,५२३ सातपूर नाशिक | वाणिज्य ( शॉपिंग भूखंड ) | - | २८.४७ | ३३८२० | ९६२८५५.४० | १९.९९०३७९ | ७३.७२८४१ |
| ४ | नाशिक | स. क्र. ५१७,५२०,५२१,५२३ सातपूर नाशिक | वाणिज्य ( शॉपिंग भूखंड ) | - | २८.४७ | ३३८२० | ९६२८५५.४० | १९.९९०३७९ | ७३.७२८४१ |
| ५ | नाशिक | स. क्र. ५१७,५२०,५२१,५२३ सातपूर नाशिक | वाणिज्य ( शॉपिंग भूखंड ) | - | २८.४७ | ३३८२० | ९६२८५५.४० | १९.९९०३७९ | ७३.७२८४१ |
| ६ | नाशिक | स. क्र. ५१७,५२०,५२१,५२३ सातपूर नाशिक | वाणिज्य ( शॉपिंग भूखंड ) | - | २८.४७ | ३३८२० | ९६२८५५.४० | १९.९९०३७९ | ७३.७२८४१ |
| ७ | नाशिक | स. क्र. ५१७,५२०,५२१,५२३ सातपूर नाशिक | वाणिज्य ( शॉपिंग भूखंड ) | - | २५.८७५ | ३३८२० | ८७५०९२.५० | १९.९९०३७९ | ७३.७२८४१ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | नाशिक | स. क्र. ५१७,५२०,५२१,५२३ सातपूर नाशिक | वाणिज्य ( शॉपिंग भूखंड ) | - | २५.८७५ | ३३८२० | ८७५०९२.५० | १९.९९०३७९ | ७३.७२८४१ |
| ९ | नाशिक | स. क्र. ५१७,५२०,५२१,५२३ सातपूर नाशिक | वाणिज्य ( शॉपिंग भूखंड ) | - | २५.३१ | ३३८२० | ८५५९८४.२० | १९.९९०३७९ | ७३.७२८४१ |
| १० | नाशिक | स. क्र. ३५,३६,३७,२८, २९,२७,३०/१, ३०/२, २६, २४A, २४B मालेगाव ता. मालेगाव जि. नाशिक | शैक्षणिक | माध्यमिक शाळा | ५६८०.०० | ४८७० | २७६६१६००.०० | २०.५५८२९१ | ७४.५३७७७ |
| ११ | नाशिक | स. क्र. २७९, २८०(P) मनमाड नाशिक | शैक्षणिक | माध्यमिक शाळा | ४३६८.०० | ३३३० | १४५४५४४०.०० | २०.२५२८०५ | ७४.४२६७७६ |
| १२ | नाशिक | स. क्र. २७९, २८०(P) मनमाड नाशिक | शैक्षणिक | माध्यमिक शाळा | ७९९४.०० | ३३३० | २६६२००२०.०० | २०.२५०४७४ | ७४.४२७६२२ |
| १३ | नाशिक | स. क्र. १०१/०२ कोटमगाव ता. निफाड नाशिक | सुविधा भुखंड | - | ३००२.३७ | ४२२० | १२६७०००१.४० | २०.१४३९१८ | ७४.२१७०१५ |
| १४ | नाशिक | स. क्र. १०१/०२ कोटमगाव ता. निफाड नाशिक | सुविधा भुखंड | - | १४९०.३८ | ४२२० | ६२८९४०३.६० | २०.१४४३ | ७४.२१५४४२ |
| १५ | नाशिक | स. क्र. २५-C देवळाली नाशिक | सुविधा भुखंड | - | १९८ | १४६४० | २८९८७२०.०० | १९.९६०८७८ | ७३.८२४३५४ |
| १६ | नाशिक | स. क्र. ३०९(P), ३१३(P) पाथर्डी नाशिक | सुविधा भुखंड १ | - | २५२.३७ | २६४०० | ६६६२५६८.०० | १९.९४७३६८ | ७३.७६७८१८ |
| १७ | नाशिक | स. क्र. ३०९(P), ३१३(P) पाथर्डी नाशिक | सुविधा भुखंड २ | - | २०५.७३ | २८६४० | ५८९२१०७.२० | १९.९४८३५६ | ७३.७६८९८ |
| १८ | अहिल्यानगर | स. क्र.. ५९, ६०, ६२, ६३ (p) श्रीरामपूर, | वाणिज्य भुखंड | भाजी मंडई व विक्री केंद्र | ११८८.०० | ५६६० | ६७२४०८०.०० | १९.६१०७१२ | ७४.६५५११२ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अहिल्यानगर | | | | | | | |
| १९ | अहिल्यानगर | स. क्र.. ५५/ १ (p), ५५/ २ (P),५५/ ३ (p) तपोवन रोड, सावेडी अहिल्यानगर | सुविधा भुखंड | - | २२२७.१६ | ३२२२० | ७१७५९०९५.२० | १९.१४२००५ | ७४.७४२८५३ |
| २० | धुळे | स. क्र. ४७१,४७७,४७८ चाळीसगाव रोड , धुळे(पश्चिम बाजू हूडको कॉलनी) | शैक्षणिक | प्राथमिक शाळा | १०१०.०० | १५२७० | १५४२२७००.०० | २०.८७३३९९ | ७४.७५०१२८ |
| २१ | जळगांव | स. क्र. १२२/(p), F.P NO. ८०(P) & ८१(P) जामनेर रोड, भूसावळ जळगाव | सुविधा भुखंड | - | ३८५.०० | १४७४० | ५६७४९००.०० | २१.०३०५९७ | ७५.७८१७५७ |
| २२ | जळगांव | स. क्र. १२२/(p), F.P NO. ८०(P) & ८१(P) जामनेर रोड, भूसावळ जळगाव | वाणिज्य (शॉपिंग) | - | ३७७.०० | १४७४० | ५५५६९८०.०० | २१.०३०३९५ | ७५.७८२३७१ |
| २३ | जळगांव | स. क्र.२९९/१ सी, २९९/ २ भूसावळ | सुविधा भुखंड | - | १११५.७५ | ११९४० | १३३२२०५५.०० | २१.०४२४६० | ७५.७७०६५० |
| २४ | जळगांव | स. क्र. ४२९/ ०१+०२ चाळीसगाव | सुविधा भुखंड | | २३२.६० | ७५२० | १७४९१२९.४४ | २०.४६८९१२ | ७५.००४००१ |
| २५ | जळगांव | स. क्र. २०९/ बी-३ पाळधी , धरणगाव | वाणिज्य | - | ६१६.०० | २१६० | १३३०५६०.०० | २१.०१९७६१ | ७५.४५३५७७ |
| २६ | जळगांव | स. क्र. १९९/१(p) वांजोळा रोड, भूसावळ जळगाव | वाणिज्य | - | ८१३.७५ | ११९४० | ९७१६१७५.०० | २१.०३६३१२ | ७५.७७५५३४ |
| २७ | जळगांव | स. क्र. २००/१-बी, २००/२-अ भूसावळ | सुविधा भुखंड | - | १३०३.२९ | ११९४० | १५५६१२८२.६० | २१.०२६६१६ | ७५.७७६६९४ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २८ | जळगांव | स. क्र.२९९/१ सी, २९९/ २ भूसावळ | वाणिज्य | - | ४१०.७५ | ११९४० | ४९०४३५५.०० | २१.०४२४६० | ७५.७७०६५० |
| २९ | जळगांव | एफ पी २३३(p) अमळनेर | वाणिज्य १ | - | ६०८.०० | ७७२० | ४६९३७६०.०० | २१.०४६२५४ | ७५.०५१८०६ |
| ३० | जळगांव | एफ पी २३३(p) अमळनेर | वाणिज्य २ | - | ४५०.७५ | ७७२० | ३४७९७९०.०० | २१.०४६२५४ | ७५.०५१८०६ |
| ३१ | जळगांव | एफ पी २३३(p) अमळनेर | वाणिज्य ३ | - | १९५.०० | ७७२० | १५०५४००.०० | २१.०४६२५४ | ७५.०५१८०६ |

# COMMERCIAL/ AMENITY PLOT E-AUCTION JUNE-2025
# NASHIK HOUSING & AREA DEVELOPMENT BOARD, NASHIK
## COMMERCIAL/AMENITY PLOT DETAILS

| Sr. No. | District | Scheme Name & Location | Use of Plot | D.P. Reservation | Area (Sq. Mtr.) | Per Sq. Mtr. Rate | (Base Price) | Lattitude | Longitude |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1 | Nashik | Survey No. 517,520,521,523 Satpur, Nashik | Amenity | - | 484.12 | 33820 | 16372938.40 | 19.99015 | 73.726754 |
| 2 | Nashik | Survey No. 517,520,521,523 Satpur, Nashik Plot No. 5 | commercial /shopping | - | 28.47 | 33820 | 962855.40 | 19.990379 | 73.72841 |
| 3 | Nashik | Survey No. 517,520,521,523 Satpur, Nashik Plot No. 6 | commercial /shopping | - | 28.47 | 33820 | 962855.40 | 19.990379 | 73.72841 |
| 4 | Nashik | Survey No. 517,520,521,523 Satpur, Nashik Plot No. 9 | commercial /shopping | - | 28.47 | 33820 | 962855.40 | 19.990379 | 73.72841 |
| 5 | Nashik | Survey No. 517,520,521,523 Satpur, Nashik Plot No. 12 | commercial /shopping | - | 28.47 | 33820 | 962855.40 | 19.990379 | 73.72841 |
| 6 | Nashik | Survey No. 517,520,521,523 Satpur, Nashik Plot No. 15 | commercial /shopping | - | 28.47 | 33820 | 962855.40 | 19.990379 | 73.72841 |
| 7 | Nashik | Survey No. 517,520,521,523 Satpur, Nashik Plot No. 24 | commercial /shopping | - | 25.875 | 33820 | 875092.50 | 19.990379 | 73.72841 |
| 8 | Nashik | Survey No. 517,520,521,523 Satpur, Nashik Plot No. 25 | commercial /shopping | - | 25.875 | 33820 | 875092.50 | 19.990379 | 73.72841 |
| 9 | Nashik | Survey No. 517,520,521,523 Satpur, Nashik Plot No. 34 | commercial /shopping | - | 25.31 | 33820 | 855984.20 | 19.990379 | 73.72841 |
| 10 | Nashik | Survey No. 35,36,37,28,29,27,30/1,30/2,26, 24A,24 B Malegaon, Nashik | Educational | High school | 5680.00 | 4870 | 27661600.00 | 20.558291 | 74.53777 |
| 11 | Nashik | Survey No.279, 280(P) Manmad, Nashik | Educational | High school | 4368.00 | 3330 | 14545440.00 | 20.252805 | 74.426776 |
| 12 | Nashik | Survey No.279, 280(P) Manmad, | Educational | High school | 7994.00 | 3330 | 26620020.00 | 20.250474 | 74.427622 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Nashik | | | | | | | |
| 13 | Nashik | Survey No.101/02 Kotamgaon Tal. Niphad, Nashik | Amenity plot | - | 3002.37 | 4220 | 12670001.40 | 20.143918 | 74.217015 |
| 14 | Nashik | Survey No.101/02 Kotamgaon Tal. Niphad, Nashik | Amenity plot | - | 1490.38 | 4220 | 6289403.60 | 20.1443 | 74.215442 |
| 15 | Nashik | Survey No.25-C Deolali, Nashik | Amenity plot | - | 198 | 14640 | 2898720.00 | 19.960878 | 73.824354 |
| 16 | Nashik | Survey No. 309(P), 313(P) Pathardi, Nashik | Amenity plot-1 | - | 252.37 | 26400 | 6662568.00 | 19.947368 | 73.767818 |
| 17 | Nashik | Survey No. 309(P), 313(P) Pathardi, Nashik | Amenity plot-2 | - | 205.73 | 28640 | 5892107.20 | 19.948356 | 73.76898 |
| 18 | Ahilyanagar | Survey No. 59,60,62,63 (P) Shrirampur, Ahilyanagar. | Commercial | Vegetables Market & Selling Centre | 1188.00 | 5660 | 6724080.00 | 19.610712 | 74.655112 |
| 19 | Ahilyanagar | Survey No. 55/1 (P), 55/2 (P),55/3 (P) Tapovan road, Savedi, Ahilyanagar. | Amenity plot | - | 2227.16 | 32220 | 71759095.20 | 19.142005 | 74.742853 |
| 20 | Dhule | Survey No. 471,477,478 Chalisgaon road, Dhule (west side Hudco Colony) | Educational | Primary school | 1010.00 | 15270 | 15422700.00 | 20.873399 | 74.750128 |
| 21 | Jalgaon | Survey No. 122(P), F.P. NO. 80 (P) & 81 (P) Jamner road, Bhusaval Jalgaon. | Amenity plot | - | 385.00 | 14740 | 5674900.00 | 21.030597 | 75.781757 |
| 22 | Jalgaon | Survey No. 122(P), F.P. NO. 80 (P) & 81 (P) Jamner road, Bhusaval Jalgaon. | commercial /shopping | - | 377.00 | 14740 | 5556980.00 | 21.030395 | 75.782371 |
| 23 | Jalgaon | Survey No. 299/1 C, 299/2, Bhusaval. | Amenity plot | - | 1115.75 | 11940 | 13322055.00 | 21.042460 | 75.770650 |
| 24 | Jalgaon | Survey No. 429/01+02 Chalisgaon. | Amenity plot | - | 232.60 | 7520 | 1749129.44 | 20.468912 | 75.004001 |
| 25 | Jalgaon | Survey No. 209/ B-3 Paldhi, Dharangaon. | commercial | - | 616.00 | 2160 | 1330560.00 | 21.019761 | 75.453577 |
| 26 | Jalgaon | Survey No. 199/1 (P) Vanjola road, Bhusaval,Jalgaon. | commercial | - | 813.75 | 11940 | 9716175.00 | 21.036312 | 75.775534 |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 27 | Jalgaon | Survey No. 200/1 B, 200/2-A, Bhusaval. | Amenity plot | - | 1303.29 | 11940 | 15561282.60 | 21.026616 | 75.776694 |
| 28 | Jalgaon | Survey No. 299/1 C, 299/2, Bhusaval. | commercial | - | 410.75 | 11940 | 4904355.00 | 21.042460 | 75.770650 |
| 29 | Jalgaon | F P 233(P) Amalner | commercial-1 | - | 608.00 | 7720 | 4693760.00 | **21.046254** | **75.051806** |
| 30 | Jalgaon | F P 233(P) Amalner | commercial-2 | - | 450.75 | 7720 | 3479790.00 | **21.046254** | **75.051806** |
| 31 | Jalgaon | F P 233(P) Amalner | commercial-3 | - | 195.00 | 7720 | 1505400.00 | **21.046254** | **75.051806** |